# Kore Foods Limited

**Registered Office: Vision House, Tivim Industrial Estate, Mapusa, Goa, 403 526.**
**Email – companysecretary@korefoods.in Tel No. (0832) 6650705**

**CIN L33208GA1983PLC000520**

3rd September, 2024

To

Bombay Stock Exchange
P. J. Towers,
25th Floor,
Dalal Street,
Mumbai – 400 001.

**<u>Scrip Code: 500458</u>**

Dear Sir,

**Subject: Notice to Shareholders regarding Annual General Meeting, E-voting and Book Closure Published in the Newspapers.**

Enclosed please find the Notice to Shareholders regarding Annual General Meeting, E-Voting and Book Closure pursuant to SEBI (Listing Obligations and Requirements) Regulations, 2015 published in Goan Varta (Marathi) Newspaper dated 03.09.2024 and Times of India (Goa Edition) Newspaper dated 03.09.2024.

Thanking You.

Yours faithfully,
for Kore Foods Limited

Puja Upendra Joshi
Digitally signed by Puja Upendra Joshi

Puja Joshi
Company Secretary –cum-Compliance Officer

Encl: As above.

**बुलडोझरच्या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी :** १७ रोजी पुढील सुनावणी

# आरोपीचे घर पाडणे योग्य नाही!

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**नवी दिल्ली :** बुलडोझरच्या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. केवळ आरोपी असल्याच्या आधारे एखाद्याचे घर पाडणे योग्य नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. सरकार आणि प्रशासनाच्या कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत न्यायालयाने म्हटले की, एखादी व्यक्ती दोषी असली तरी त्याचे घर पाडता येत नाही.

सर्वोच्च न्यायालयात सोमवारी बुलडोझर प्रकरणी सुनावणी सुरू झाली. न्यायमूर्ती गवई आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला. महापालिकेच्या कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आल्याचे मेहता यांनी सांगितले.

अवैध धंद्यांबाबत महापालिकेने नोटीस देऊनच कारवाई केली आहे, असे मेहता म्हणाले. न्यायमूर्ती विश्वनाथन यांनी सरकारकडे सविस्तर उत्तर मागितले आहे. नोटीस, कारवाई आणि अन्य आरोपांना उत्तर देण्याचे निर्देश न्यायालयाने सरकारला दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १७ सप्टेंबर रोजी होणार आहे.



## बेकायदा बांधकामांना संरक्षण नाही!

रस्ता अडवून केलेल्या बेकायदा बांधकामांना कोणतेही संरक्षण देणार नसल्याचे न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले. सरकार त्यांच्यावर कारवाई करू शकते. बेकायदा बांधकामाच्या आरोपावरून कोणतीही नोटीस न देता घरे पाडू नयेत, या मुद्द्यावरच त्याची सुनावणी सुरू आहे.

## बेकायदा बांधकामांमुळेच लक्ष्य!

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण मान्य केले आणि गुन्हा सिद्ध झाला तरी घर पाडता येणार नाही, असे सांगितले. ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, त्यांना बेकायदा धंदे किंवा बांधकामामुळे लक्ष्य केले जात आहे, गुन्ह्याच्या आरोपांमुळे नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## ९०च्या दशकापासून बुलडोझरचा वापर

मध्यप्रदेशात बुलडोझरची कारवाई ९० च्या दशकात सुरू झाली. त्यावेळी बुलडोझर हे विकासाचे प्रतीक होते. माजी मुख्यमंत्री बाबूलाल गौर यांनी पटवा सरकारमध्ये नगर प्रशासन मंत्री असताना अतिक्रमण काढण्यासाठी बुलडोझरचा वापर केला होता.

**जमियत उलेमा ए हिंदकडून याचिका :** आरोपींच्या घरांवर मनमानीपणे बुलडोझर चालवणाऱ्या सरकारवर बंदी घालण्याची मागणी करणारी याचिका जमियत उलेमा-ए-हिंदने दाखल केली आहे. याचिकेत उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये नुकत्याच झालेल्या बुलडोझर कारवायांचा हवाला दिला होता.

## विभव कुमार यांना अखेर जामीन

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**नवी दिल्ली :** राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर हल्ला केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विभव कुमारना जामीन मंजूर केला. विभव कुमार यांना सर्वोच्च न्यायालयाकडून काही अटींसह हा दिलासा मिळाला आहे. विभव कुमारच्या जामीन याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिपण्णी केली.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आरोपी १०० दिवसांपेक्षा जास्त काळ कोठडीत आहे. वैद्यकीय अहवालानुसार ही मारहाण साधी आहे. मात्र, दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात विभवच्या जामिनाला विरोध केला.

या प्रकरणात अनेक महत्त्वाचे साक्षीदार हजर व्हायचे असून विभव पुरावे आणि साक्षीदारांवर प्रभाव टाकू शकतो, असे पोलिसांनी सांगितले. त्यावर न्यायालयाने म्हटले की, तो असे करू शकणार नाही, अशा अटी आम्ही घालू.

# तेलंगणा-आंध्र प्रदेशात पावसाचे रौद्ररूप; २४ जणांचा मृत्यू

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**हैदराबाद :** तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पाऊस झाला. यामुळे रविवार १ सप्टेंबरच्या संध्याकाळपर्यंत आंध्र प्रदेशात १५ आणि तेलंगणात ९ जणांचा पावसामुळे मृत्यू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवंत रेड्डी यांच्याशी चर्चा केली आहे.

पाऊस आणि पुराचा सामना करण्यासाठी केंद्र सरकारने दोन्ही राज्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) २६ टीम तेलंगणा आणि आंध्र प्रदेशमध्ये पूर मदत आणि बचाव कार्यासाठी तैनात आहेत. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दोन्ही राज्यांमध्ये १२ टीम आधीच तैनात आहेत. याशिवाय १४ टीम तेथे पाठवण्यात आल्या आहेत. देशभरातील विविध ठिकाणांहून ही पथके तेथे पोहोचत आहेत. एनडीआरएफच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन शेजारील राज्यांमध्ये तैनात करण्यात आलेले बचाव पथक वेगवेगळ्या उपकरणांनी सुसज्ज आहेत.



## मुसळधार पावसामुळे अनेक गाड्या रद्द

दक्षिण मध्य रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले की, मुसळधार पाऊस आणि अनेक ठिकाणी रुळांवर पाणी साचल्याने ९९ गाड्या रद्द करण्यात आल्या आणि चार गाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या. तर ५४ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. दोन्ही राज्यांमध्ये नद्यांना उधाण आले आहे आणि राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांनी पूरग्रस्त भागातील हजारो लोकांना मदत शिबिरांमध्ये हलवले आहे.

### सुरक्षित ठिकाणी पाठवले

वेळीच सावधगिरीच्या उपाययोजना केल्यामुळे जीवित आणि मालमत्तेची हानी कमी झाली आहे, असे तेलंगणाचे महसूल मंत्री पोंगुलेती श्रीनिवास रेड्डी यांनी सांगितले. ते म्हणाले की, या उपाययोजना करूनही राज्याच्या विविध भागांत पावसाशी संबंधित वेगवेगळ्या घटनांमध्ये नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. महबूबाबाद आणि खम्मम जिल्ह्यातही तीन जण वाहून गेल्याची शक्यता आहे. सूर्यपेट, भद्राद्री कोठागुडेम, महबूबाबाद आणि खम्मम सारख्या इतर जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांनी अनेक पूरग्रस्त गावांतील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.

## आपचे आमदार अमानतुल्लांवर ईडीकडून अटकेची कारवाई

न्यूज डेस्क। गोवन वार्ता



**नवी दिल्ली :** आम आदमी पार्टीचे (आप) ओखला आमदार अमानतुल्ला खान यांना अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. सकाळी सुमारे ६ तास त्यांच्या निवासस्थानावर छापे टाकल्यानंतर ईडीच्या पथका त्यांना सोबत घेऊन रवाना झाले.

कथित वक्फ बोर्ड घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात ईडीने ही कारवाई केली आहे. सकाळच्या छाप्यानंतर अमानतुल्ला खान यांच्या घरी चांगलाच गोंधळ उडाला. ईडीच्या पथकाला आपल्या घरात घुसण्यापासून रोखण्याचा प्रयत्न आमदार करत राहिले. त्यांनी सासूच्या आजारपणाचे कारणही सांगितले होते.

## वैष्णोदेवी मार्गावर दरड कोसळून दोघांचा मृत्यू

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**श्रीनगर :** वैष्णोदेवी मार्गावर दरड कोसळण्याची घटना घडली. पायी मार्गावर हिमकोटीजवळ ही घटना घडली. यात दोन भाविकांचा मृत्यू झाला असून एक जखमी आहे. या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे. यामध्ये फूटपाथवर बांधलेले पत्र्याचे शेड दरड कोसळल्यानंतर तुटले. रियासीच्या जिल्हा आयुक्तांनी याला दुजोरा दिला.

दुपारी २.३५ च्या सुमारास इमारतीच्या तीन किमी पुढे पंछीजवळ भूस्खलन झाले, यामुळे वरच्या लोखंडी संरचनेचा एक भाग देखील खराब झाला. दरड कोसळल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले, अशी माहिती आयुक्तांनी दिली. जम्मू-काश्मीरमध्ये अधूनमधून पाऊस पडत आहे, त्यामुळे भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यापूर्वी १५ ऑगस्ट रोजी दक्षिण देवरीजवळ श्री माता वैष्णोदेवी यात्रा मार्गावर दरड कोसळली होती, ज्यामुळे यात्रेकरूंचा पवित्र मंदिराचा प्रवास तात्पुरता विस्कळीत झाला होता. परिसरात मुसळधार पाऊस सुरू असताना ही घटना घडली असून कोणतीही जीवितहानी झाली नव्हती.



## हमासकडून इस्रायली ओलिसांची गाझात गोळ्या घालून हत्या

न्यूज डेस्क। गोवन वार्ता

**जेरूसलेम :** गाझात सहा इस्रायली ओलिसांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. इस्रायलचा दावा आहे की, इस्रायली सैन्य गाझातील बोगद्याजवळ येत असल्याची खबर हमासच्या सैनिकांना मिळाली तेव्हा त्यांनी या ओलीसांना ठार केले.

इस्रायलच्या आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, या सहा ओलिसांच्या शवविच्छेदन अहवालावरून असे दिसून आले आहे की त्यांची हत्या ४८ ते ७२ तासांपूर्वी म्हणजेच गुरुवार ते शुक्रवार दरम्यान करण्यात आली होती. आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, अबू कबीर फॉरेन्सिक इन्स्टिट्यूटला आढळून आले आहे की या सर्व ओलिसांवर अनेक वेळा जवळून गोळ्या झाडण्यात आल्या होत्या.

इस्रायली आर्मी चीफ ऑफ स्टाफ लेफ्टनंट जनरल हर्झी हालेवी यांनी सहा ओलिसांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले त्या बोगद्याला भेट दिली. त्यांच्यासोबत सदर्न कमांडचे प्रमुखही उपस्थित होते. इस्रायली प्रसारमाध्यमांच्या म्हणण्यानुसार, हमासने या ओलिसांची हत्या केल्याचा सुरक्षा अधिकाऱ्यांचा संशय आहे, कारण गेल्या आठवड्यात इस्रायली सैन्याने ज्या ओलिसांची जिवंत सुटका केली त्यांच्यामार्फत आयडीएफला या ओलिसांची माहिती मिळेल अशी भीती होती.

### एका ओलिसाची सुटका

गेल्या आठवड्यात इस्रायली सैन्याने ५२ वर्षीय ओलीस फरहान अल-कादी याला सुखरूप बाहेर काढले. गाझामध्ये हमासने बांधलेल्या बोगद्यातून त्याची सुटका करण्यात आली, तर हमासचे दहशतवादी तेथून पळून जाण्यात यशस्वी झाले होते.

## राशीभविष्य

**मेष** – आपल्या व्यापार व्यवसायामध्ये आपण चांगले काम करणार आहात. आपल्या कामांमध्ये अडचणी आल्यास आपले मित्र व सहकारी आपल्याला सहाय्य करणार आहेत.

**वृषभ** – आपल्या नोकरी व्यवसाय मध्ये नवीन कल्पना सुचतील. त्या अमलात आणल्यामुळे आपल्याला कामामध्ये प्रगती झाल्याचे आढळून येईल. आपली महत्त्वाची कामे सुरळीत होणार आहेत.

**मिथुन** – व्यापार व्यवसायात आपल्या चांगली वाढ होणार आहे. व्यवसायामध्ये अपेक्षित उत्पन्न मिळणार आहे. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढल्यामुळे खर्चही वाढतील. घरातील खर्चाला प्राधान्य द्याल.

**कर्क** – आजचा दिवस आपणास सुखसोयींचा जाणार आहे. स्वतःच्या कामांमध्ये अडचणी दूर होणार आहेत. पैशाचे हे प्रश्न सुटणार आहेत. त्यामुळे देणी दिली जातील. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव राहील.

**सिंह** – अनपेक्षित खर्च वाढणार आहेत. महत्वाचे निर्णय आज घेऊ नका. काही निर्णय तडजोड करूनच घ्यावे लागतील. शांतपणे विचार करा. आपल्या काही तत्वांना आळा घालावा लागणार आहे.

**कन्या** – कामाची धावपळ चालू राहणार आहे एकाच विचारात अडकून नका. कामाचे नियोजन करा म्हणजे काम दोनदा करावे लागणार नाही. नोकरीमध्ये चांगले वातावरण असणार आहे.

**तुळ** – प्रलंबित कामांना गती मिळणार आहे. मन प्रसन्न असणार आहे. जिभेचे चोचले पुरवताना स्वतःच्या तब्येतीची काळजी घेण्याची आवश्यकता आहे.घरातल्या समस्यांमध्ये अडकू नका.

**वृश्चिक** – नोकरी मध्ये स्वतःच्या मनासारखे वातावरण राहणार आहे कामामध्ये लक्ष केंद्रीत राहील. एखाद्या कार्यक्रमात सहभागी व्हावे लागेल. प्रभास होण्याची शक्यता. मनासारख्या घटना घडतील.

**धनु** – आजचा दिवस मिश्र स्वरूपाचे जाणार आहे. नोकरी व्यवसाय मध्ये जास्त काम पडणार आहे. कामाचा ताण येण्याची शक्यता आहे. आपण आपले काम प्रलंबित करू नका. शक्यतो प्रवास टाळा.

**मकर** – मुलांच्या अडचणी काही असतील तर त्या फार जवळून समजून घ्या. त्यांना पुरेसा वेळ द्या. त्यांच्याशी सुसंवाद साधणे गरजेचे आहे. आपल्या योजना कार्यान्वित होणार आहेत.

**कुंभ** – आपल्या ग्रह सौख्यात वाढ होणार आहे. जीवनसाथी तुमच्या मर्जीनुसार वागणार आहे. वडिलोपार्जित संपत्ती ची कामे मार्गी लागतील. आर्थिक बाजू चांगली राहणार आहे. चांगल्या संधी मिळतील.

**मीन** – आपल्या कामामध्ये प्रगती होणार आहे. नातेवाईकांचे सहकार्य लाभणार आहे. त्यांच्या भेटीगाठी होऊन आनंद मिळणार आहे. एखादी चांगली बातमी कळणार आहे. प्रवासाची शक्यता आहे.

## मागील उत्तर (५९७९)



## शब्दवेध (५९८०)



**आडवे शब्द –**
१) एकच प्याला, २) वर्षानुवर्षे, ५) आश्रम, ६) उणीव; तुटवडा, ८) प्रौढ, ९) फिकट तांबडा; गेरुवा, ११) बूड, १२) चाल; पद्धत, १४) मानसिक आघात, १६) तर्र; बेहोश; गुंग, १८) असंस्कृत; एक भाजीशेंग, १९) बेचैनी, २०) घाणा, २१) खोडी; भांडण, २२) सोने, २४) परवानगीशिवाय; अवैध, २६) अंतर्गत भांडण, २८) विख्यात.

**उभे शब्द –**
१) अटकाव; प्रतिबंध, २) एक सम संख्या, ३) विष्णू, ४) सुमारे, ५) चेष्टा, ७) एक भोज्य पदार्थ, १०) गंध, १३) धष्टपुष्ट, १५) मोठा दगड, १७) मध्यंतरी, २१) कुंतीपुत्र, २२) खिन्न, २३) ठप्प; कोंडलेला, २४) टाटा; बाय बाय (निरोप देताना), २५) हळू; संथ, २६) वाहन, २७) कंटाळा.

(उत्तर : पुढील अंकात)

**CHANGE IN NAME**

I, **Platilda Cunha** r/o H no. 465/1 Guneavaddo Varca - south Goa - 403721, has changed my name from **Platilda Fernandes** to **Platilda Cunha.** Hereafter in all my dealings and documents I will be known as **Platilda Cunha**

sd/-
Platilda cunha

**CHANGE OF NAME**

I, **PANDURANG SHRIKANT HARIJAN**, S/o SHRIKANT FATI HARIJAN, R/o H. No. 64, Hankhane, Pernem, Goa have changed my Name to **PANDURANG SHRIKANT GAONKAR**.
Henceforth in all my proceedings & for all future purposes, I will be known as **PANDURANG SHRIKANT GAONKAR.**

Sd/-
PANDURANG SHRIKANT GAONKAR

**TRANSFER OF VEHICLES**

I undersigned smt. Priyanka Prakash Palyekar wife of Late. Prakash Yeshwant Palyekar r/o H.No 268, Nagzar, Warkhand Pernem Goa, would like to change ownership of vehicle bearing registered number GA11T1891 , black-yellow three wheeler passenger Auto Rikshaw is being transferred in the name of Smt. Priyanka Prakash Palyekar H.No 268, Nagzar, Warkhand Pernem Goa. As he is no more, if anyone has any objections to this, may contact The RTO, Pernem Goa.

**TRANSFER OF VEHICLES**

I, Radhika Rohidas Naik R/o H No.29 Buring Balli Quepem. South Goa. Wants to transfer following vehicles. Hero pleasure Register no GA 09 M 5123. Maruti Ignis Register no GA 09 D 6577. Hero Honda Pleasure Register no GA 09 F 2658. Hero Pleasure Register GA 09 AC 0074. in my name due to death of my Father late Rohidas shambu Naik. Anybody having any objection please intimate to RTO Quepem within 15 days.

गोवा सरकार,
**कार्यकारी अभियंत्याचे कार्यालय,**
**काम विभाग XVII (डब्ल्यूएस),**
**सार्वजनिक बांधकाम खाते,**
**आल्त-पर्वरी, बार्देश, गोवा**
**ई-निविदा सूचना**

**क्र. पीडब्ल्यूडी/डीXVII/डब्ल्यूएस/एएसडब्ल्यू/एफ-24-ई/06/2024-25** **दिनांकित: 30/08/2024**

1. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख: 12/09/2024 दुपारी 3 पर्यंत.
2. निविदा ऑनलाईन सादर करण्याची शेवटची तारीख: 12/09/2024 दुपारी 3 पर्यंत.
3. ऑनलाईन निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 13/09/2024 सकाळी 11.30 नंतर.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क करा कार्यकारी अभियंत्याचे कार्यालय डब्ल्यूडी XVII (डब्ल्यूएस), पीडब्ल्यूडी, आल्त पर्वरी गोवा.

**(संकेतस्थळ:-https://eprocure.goa.gov.in)**
**डीआय/जाहिरात/778/2024**

"मास्क वापरा, सामाजिक अंतर राखा, हातांची स्वच्छता ठेवा"

**कोर फूड्स लिमिटेड**
**(फिल कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून पूर्वी ओळखले जाणारे)**
**सीआयएन : एल ३३२०८जीए१९८३पीएलसी०००५२०**
**नोंदणीकृत कार्यालय: व्हिजन हाऊस, थिवी इंडस्ट्रीअल इस्टेट, म्हापसा, गोवा ४०३५२६**
**दूरध्वनी: +९१-८३२-६६५०७०५**
**ईमेल आयडी : companysecretary@korefoods.in | संकेतस्थळ www.korefoods.in**

**सूचना**

**याद्वारे सूचना दिली जातेः**

१. एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे सामान्य आणि विशेष व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी कोर फूड्स लिमिटेड (कंपनी) कंपनीची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम बैठक) **शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता** तिच्या नोंदणीकृत कार्यालय, व्हिजन हाऊस, थिवी इंडस्ट्रीअल इस्टेट, म्हापसा गोवा - ४०३५२६ येथे होणार आहे.
२. कंपनी प्रत्यक्ष उपस्थितीसह एजीएम बोलावेल व बैठकीला उपस्थित राहण्यासाठी सदस्यांना व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) किंवा अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) ची सुविधा देखील प्रदान करेल. व्हीसी / ओएव्हीएमच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित राहण्याचा इरादा असलेल्या सदस्यांना **२१ सप्टेंबर २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी **companysecretary@korefoods.in** ईमेलद्वारे कंपनीला अशी विनंती पाठविण्याची विनंती केली जाते. सदस्य ओळखपत्रांची पडताळणी केल्यानंतरच बैठकीला उपस्थित राहण्याची लिंक सदस्याला पाठविली जाईल. ई-व्होटिंगसाठी ४१ व्या एजीएमच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार यशस्वी लॉगइननंतर कंपनीचे ईव्हीएसएन प्रदर्शित केले जाईल व तेथे बैठकीला उपस्थित राहण्यासाठी व्हीसी / ओएव्हीएमची लिंक उपलब्ध असेल.
३. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले परिपत्रक **दिनांकित ०८/०४/२०२० १३/०४/२०२०, ०५/०५/२०२०** आणि **२५.०९.२०२३** (एकत्रितपणे एमसीए परिपत्रक म्हणून संबोधले जाते) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) **०७.१०.२०२३** रोजी जारी केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने एजीएमची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२३-२०२४ दरम्यान वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या सदस्यांना पाठविला आहे ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार किंवा ट्रान्सफर एजंट / डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत आहेत. एजीएमची नोटीस आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक मार्गाने पाठविण्याचे काम **०२.०९.२०२४** रोजी पूर्ण झाले आहे.
४. वार्षिक अहवाल सोबत एजीएम नोटीसही कंपनीच्या **संकेतस्थळावर https://www.korefoods.in/sites/default/files/docs/Annual-Report2023-2024.pdf** अपलोड केला असून हा अहवाल व नोटीस बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या **www.bseindia.com** या संकेतस्थळावरही पाहता येतो. **www.evotingindia.com** या सीडीएसएलच्या संकेतस्थळावर एजीएम सूचनादेखील उपलब्ध करून दिली जाईल.
५. कंपनीज (मॅनेजमेंट अॅन्ड अॅडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या नियम २० सह वाचण्यात येणाऱ्या कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ अनुपालनात व सेबी (लिस्टींग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या ४४ रेग्युलेशन प्रमाणे (सुधारित म्हणून) आणि एमसीए परिपत्रके **दिनांकित ०८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, ०५ मे २०२०** आणि **२५.०९.२०२३** नुसार एजीएममध्ये मतदान करण्यासाठी कंपनी ई-मतदानाद्वारे म्हणजे एजीएम आधी रिमोट ई व्होटिंगद्वारे मत नोंदवण्याची सुविधा देणार आहे आणि व्हीसी / ओएव्हीएमद्वारे बैठकीला उपस्थित असलेल्यांसाठी एजीएम दरम्यान ई-मतदान आणि एजीएममध्ये प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या सदस्यांसाठी मतदानाद्वारे प्रत्यक्ष मतदान प्रदान करीत आहे. यासाठी कंपनीने अधिकृत ई व्होटिंग एजन्सी म्हणून इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान सुलभ करण्यासाठी सेंट्रल डिपॉझिटरी सर्विसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) बरोबर करार केला आहे.
६. २० सप्टेंबर २०२४ च्या कटऑफ तारखेनुसार भौतिक स्वरूपात किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य रिमोट ई. मतदान एजीएम दरम्यान ई - मतदान जे व्हीसी / ओएव्हीएमद्वारे एजीएममध्ये उपस्थित रहातील आणि पोलद्वारे प्रत्यक्ष मतदान जे प्रत्यक्ष उपस्थितीद्वारे . एजीएममध्ये उपस्थित रहातील ते वरील मतदानाची सुविधा घेण्यास हक्कदार असतील.

**सर्व सदस्यांना कळविले जाते की:**

I) एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे सामान्य आणि विशेष व्यवसाय इलेक्ट्रॉनिक मार्गाने मतदानाद्वारे किंवा वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष मतदानाद्वारे व्यवहार केला जाईल.
II) रिमोट ई - व्होटिंग **सोमवार २३ सप्टेंबर २०२४ रोजी ९.०० वाजता** सुरू होईल.
III) रिमोट ई - व्होटिंग **गुरुवार २६ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता** संपेल.
IV) इलेक्ट्रॉनिक मार्गाने किंवा एजीएममध्ये प्रत्यक्ष मतदान करण्याची पात्रता निश्चित करण्याची कट ऑफ तारीख २० सप्टेंबर २०२४ आहे. सदस्यांचे मतदानाचे हक्क कटऑफ तारखेनुसारच्या पेडअप इक्विटी भांडवलातील त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात असतील.
V) कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स विकत घेते आणि एजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे सदस्य बनते आणि कट ऑफ तारखेनुसार म्हणजेच शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ पर्यंत शेअर्स धारण करते, ती हेल्पडेस्कवर **evoting@cdslindia.com** विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर एखादा सदस्य आधीच ई मतदानासाठी सीडीएसएलमध्ये नोंदणीकृत असेल तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मतदानासाठी वापरला जाऊ शकतो. कट-ऑफ तारखेनुसार सदस्य नसलेल्या व्यक्तीने एजीएमची सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळली पाहिजे.
VI) त्यानंतर सीडीएसएलद्वारे ईमतदानासाठी रिमोट ई- व्होटिंग मॉड्यूल अक्षम केले जाईल आणि त्यानंतर रिमोट ई - व्होटिंगद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. एकदा ठरावावर सदस्यांनी मतदान केले की नंतर त्यांना ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही,
VII) एजीएम दरम्यान ई- मतदानाची सुविधा दिली जाईल. व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित असलेले आणि रिमोट ई - मतदानाद्वारे ठरावांवर मतदान न केलेले आणि अन्यथा तसे करण्यास मनाई नसलेले सदस्यच एजीएमदरम्यान उपलब्ध ई- मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
VIII) एजीएमदरम्यान प्रत्यक्ष मतदानाद्वारे मतदानाची सुविधा दिली जाईल. एजीएममध्ये प्रत्यक्ष उपस्थित असलेले आणि रिमोट ई - व्होटिंगद्वारे ठरावांवर मतदान न केलेले आणि अन्यथा तसे करण्यास मनाई नसलेले सदस्यच एजीएमदरम्यान प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.
IX) ज्या सदस्यांनी रिमोट ई-वोटिंगद्वारे एजीएमच्या आधी मतदान केले असेल ते एजीएमला मतदान करू शकत नाही, पण ते एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात.

७. सीडीएसएल ई - व्होटिंग सिस्टीममधून ईव्होटिंगला उपस्थित राहण्याबाबत तुम्हाला काही प्रश्न किंवा समस्या असतील, तर तुम्ही **helpdesk. evoting@cdslindia.com** वर तुम्ही ई - मेल करू शकता किंवा **१८००२१०९९११** या क्रमांकावर संपर्क करू शकता. सदस्यदेखील **companysecretary@korefoods.in** इथे ईमेल करू शकतात.
८. इलेक्ट्रॉनिक मार्गाने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स मफतलाल मिल कंपाऊंड्स, एन एम जोशी मार्ग, लोवर परळ (पूर्व), मुंबई- ४०००१३ किंवा **helpdesk.evoting@cdslindia.com** इथे ईमेल करा किंवा **१८००२१०९९११** वर कॉल करा.
९. वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याच्या उद्देशाने **शनिवार २१ सप्टेंबर २०२४** ते **शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४** (दोन्ही दिवस सर्वसमावेशक) पर्यंत कंपनीचे सदस्य आणि शेअर हस्तांतरण पुस्तके, रजिस्टर बंद राहतील.
१०. संचालक मंडळाने श्री. शिवराम भट, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (एसीएस **१०४५४;** सीपी क्र **७८५३**) यांची रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंग आणि बॅलेट पेपरद्वारे पारदर्शक पद्धतीने मतदान पार पाडण्यासाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.
११. एजीएमच्या रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंग सिस्टीम आणि बॅलेट पेपर व्होटिंगचे निकाल कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीपासून दोन कामकाजाच्या दिवसांत घोषित केले जातील.
१२. मतदानाचे निकाल आणि छाननीचा अहवाल कंपनीच्या वेबसाइट **www.korefoods.in,** बॉम्बे स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट **www.bseindia. com** आणि सीडीएसएलच्या वेबसाइट **www.evotingindia.com** वर उपलब्ध असतील.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**कोर फूड्स लिमिटेड**
सही-
**पुजा जोशी**
(कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी)
सदस्यत्व क्रमांक : एसीएस २१४६६

**दिनांकित:** ०२ सप्टेंबर २०२४
**ठिकाण:** थिवी, म्हापसा-गोवा

**मुद्रक व प्रकाशक** सागर लादे यांनी प्रुडंट मीडिया (गोवा) प्रा. लि. यांच्यातर्फे हे पत्र एलिगंट ऑफसेट, थिवी औद्योगिक वसाहत करासवाडा म्हापसा येथे **मुद्रित** करुन दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. येथे **प्रकाशित** केले.

**संपादक : पांडुरंग गांवकर** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी) सर्व हक्क सुरक्षित.
**संपादकीय कार्यालय :** दुसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. **वृत्तविभाग :** ०८३२-२४०५९५०, **फॅक्स :** ०८३२-२४०५९५२, **ईमेल :**news.varta@thegoan.net, goanvarta@gmail.com **सावंतवाडी कार्यालय :** कोकणसाद लाईव्ह, हरिप्रिया अपार्टमेंट, एस.टी. बसस्थानकानजीक, मेन रोड, सावंतवाडी. **संपर्क :** ०२३६३२७२१९१, ९९२२९२८०८१

**सूचना :** संपादकीय वगळता सर्व स्तंभ, वाचकांची पत्रे, लेख ही त्या त्या लेखकांची मते आहेत. दै. गोवन वार्ताचे संपादक, प्रकाशक आणि मालक यांची नव्हे. **वितरण चौकशी :** (०८३२) २४९०४०४, **ईमेल :** circulation@thegoan.net **जाहिरातविषयक चौकशी :** (०८३२) २४०५९८८ **ईमेल :** advertising@thegoan.net

